# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


3L43

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/

दिनांक :- 23 OCT 2017

प्रति,

**प्राचार्य,**
शासकीय/अनुदानित व विनाअनुदानित
पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी
अभ्यासक्रमाच्या संस्था,
**औरंगाबाद विभाग**

**विषय :- Migration of Physical Cash college fees to cash less college fee collection बाबत.**

संदर्भ :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. २ व १०/एनजीसी/संकीर्ण-२१/२०१७/११७२ दिनांक १३/१०/२०१७

२. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र ३५७/तांशि-४, दिनांक १४/०९/२०१७

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, संस्थामध्ये विद्यार्थ्यांकडून फि व इतर बाबींकरीता रक्कम डी.डी./रोखीने स्विकारण्यात येते, त्यामुळे संबंधित विद्यार्थी/पालक यांची गैरसोय व कालापव्यय होतो. यावर उपाय म्हणून भारतीय स्टेट बँकेने सदर फी जमा करण्याकरीता **"स्टेट बँक कलेक्ट "**नावाने ऑनलाईन सेवा उपलब्ध केली असल्याचे संदर्भिय पत्रात नमुद केलेले असून संदर्भिय शासन पत्राची प्रत या सोबत जोडण्यात येत आहे.

या पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील कॅशलेस व्यवहारास चालना देण्याच्या दृष्टीने, स्टेट बँक ऑफ इंडियासह अन्य बँकामध्ये अशा प्रकारची सेवा उपलब्ध असल्यास त्याप्रमाणे गुणवत्तेनुसार विचार करून संस्थांस्तरावर सदर पध्दती अलंबण्यात यावी, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सोबत :- शासन पत्राची प्रत

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सादर.

# महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३५७/तांशि-४,

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, दालन.क्र.४४१,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी क्र.०२२-२२०४०९३५
दिनांक - १४ सप्टेंबर,२०१७

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई

विषय :- Migration of Physical Cash College fees to cash less of college fee collection बाबत.

उप महाव्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या दिनांक ११/७/२०१७ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

२. राज्यातील महाविद्यालये / शिक्षण संस्था शिक्षण शुल्क इत्यादी विद्यार्थ्यांकडून डीडी/ रोखीने प्राप्त करीत असतात, त्याकरीता साधनसामग्री व मनुष्यबळ खर्च होते. तसेच विद्यार्थी व पालकांना रांगेत उभे राहून शुल्क भरावे लागते. त्यायोगे त्यांची गैरसोय होते. यावर उपाय म्हणून भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी ऑन-लाईन सेवा उपलब्ध केली असून या सेवेचे नाव "स्टेट बँक कलेक्ट", असे आहे. या सेवेचा लाभ सर्व महाविद्यालये/ शिक्षण संस्थांनी घेण्यासंदर्भात अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या दालनात दिनांक २८/६/२०१७ रोजी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांसमवेत चर्चा आयोजित करण्यात आली होती. या चर्चेमध्ये आपण व

ंबंधित अधिकारी उपस्थित होते. सदर चर्चेच्या अनुषंगाने स्टेट बँक ऑफ इंडियाने संदर्भाधिन त्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आपण आपल्या अखत्यारितील ोक्षण संस्थांमध्ये कॅशलेस व्यवहारास चालना देण्याच्या दृष्टीने स्टेट बँक ऑफ इंडियासह अन्य कांमध्ये अशा प्रकारची सेवा उपलब्ध असल्यास त्याप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घ्यावा.

O/C

(म.मा.मोरने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

त आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :
न सचिव (मशि), उच्च व तंत्र शिक्षण बिभाग, मंत्रालय, मुंबई

ा माहितीसाठी :
महाव्यवस्थापक, डिजीटल बँकिंग, भारतीय स्टेट बँक, लोकल हेड ऑफिस, वांद्रे-कुर्ला प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

निर्गमित
१५.९.१७